# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 07 April 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०७ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.**

****

निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगानं उमेदवारांच्या प्रचारासंबंधी परवानगीचं निवेदन स्विकारण्यासाठी सुविधा उमेदवार संकेतस्थळ उपलब्ध केलं आहे. या संकेतस्थळाच्या माध्यनमातून प्रचार कालावधीचं महत्व लक्षात घेत रॅली आयोजित करणं, तात्पुरतं पक्ष कार्यालय उघडणं, घरो-घरी जाऊन प्रचार, हेलीकॉप्टर, वाहन वापर परवाना आणि प्रचार सामग्री वितरण करण्याची परवानगी देण्यात येते. हे संकेतस्थळ म्हणजे स्वतंत्र, नि :ष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रीयेसाठी लोकतांत्रिक सिद्धांतानुसार सर्व पक्ष-उमेदवारांना समान सुविधा उपलब्ध करुन देत आहे.

लोकसभा निवडणूकिची अधिसूचना जारी झाल्यापासून फक्त वीस दिवसांतच यातून आयोगाकडे ७३ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले. ज्यामधून ४४ हजारांहून अधिक अर्ज मंजूर करण्यात आले तर दहा हजार अर्ज रद्दबातल करण्यात आले तर काही अर्ज प्रक्रीयाधीन आहेत.

****

आज जागतिक आरोग्य दिन साजरा होत आहे. स्वत:च्या आरोग्याविषयी जागरुक राहण्यासाठी या दिनाचं आयोजन करण्यात येतं. 'माझं स्वास्थ्य-माझा अधिकार' अशी यावर्षीची संकल्पना जागतिक आरोग्य संघटना म्हणजेच डब्ल्यु.एच.ओ.तर्फे मांडण्यात आली आहे. अजुनही जगातील साडेचार अब्ज म्हणजेच एकूण लोकसंख्येपैकी अर्ध्याहून जास्त लोक आरोग्य विषयक सुविधा आणि देखभालीपासून दूर असल्यानं त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची गरज याद्वारे अधोरेखीत करण्यात आली आहे.

सध्या, जीवन शैलीशी निगडीत आजार विशेषत: युवा पिढीत झपाट्यानं वाढतांना दिसत आहेत. त्यामुळे जीवन शैलीत योग्य बदल आणि योगासारख्या आरोग्यदायी

पद्धतींचा अवलंब करुन आजारांना दूर करता येईल असं नवी दिल्लीच्या एम्स – अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेतील प्रोफेसर डॉक्टर रीमा दादा यांनी आकाशवाणीशी बोलतांना नमूद केलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चंद्रपुर शहरात उद्या सायंकाळी चार वाजता निवडणूक जाहीर सभा आयोजित केली आहे. लोकसभा निवडणूकीची घोषणा झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांची ही महाराष्ट्रातील पहिलीच जाहीर प्रचार सभा असणार आहे.

****

वंचित बहुजन आघाडी पक्षातर्फे बीड लोकसभा निवडणुकीसाठी अशोक हिंगे पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्याशिवाय नागपूरच्या रामटेक लोकसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार–माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये यांना जाहीर पाठींबा देण्यात येत आहे. याबाबत पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकुर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती जाहीर केली.

****

नांदेड शहरात आज सकाळी जिल्हा पोलीस दलातर्फे सद्भावना रॅली काढण्यात आली. सध्याच्या विविध सण–उत्सवाच्या अनुषंगानं याचं आयोजन करण्यात आलं. यात जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, महापालिका आयुक्त डॉक्टर महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांसह शहरातील ठाणे अधिकारी, विविध धर्मांचे धर्मगुरू, एकात्मतेचं दर्शन घडवणारी वेशभूषा केलेल्या शालेय विद्यार्थ्यांचीही यात मोठ्या संख्येन उपस्थिती होती.

****

पुणे जिल्ह्याच्या मावळ लोकसभा मतदार संघातील पनवेलच्या ग्रामिण आणि शहरी भागात आज मतदान जनजागृती कार्यक्रम राबवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सायकल रॅलीद्वारे मतदान जनजागृती करण्यात आली. शहरातील एका शाळेत आयोजित तृतीय पंथीयांची बैठक, तसंच नविन पनवेलच्या एका प्रभागात पथनाट्याद्वारे मतदारांना मतदानाचं महत्व पटवून देण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

दरम्यान, कोल्हापूर इंथ मतदार जनजागृतीसाठी जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयातर्फे 'रन फॉर व्होट' या लोकशाही दौडच आज सकाळी आयोजन केलं होतं. या दौडमध्ये सहा हजाराहुन अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवला.

****

मणिपुरमध्ये सुरक्षा दलांनी संयुक्तपणे राबविलेल्या तपासणी अभियानात मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा सापडला असल्याची माहिती मणिपुर पोलिसांनी दिली. मणिपुर पोलिसांसह सुरक्षा दलांनी राज्यातील डोंगराळ आणि घाटमाथ्यावरील जिल्ह्यांमधील संवेदनशील भागात हे अभियान राबविण्यात आले. या अभियानात रायफल, पिस्तुल, हॅंड ग्रेनेड, बॉम्ब, डेटोनेटर, बुलेट प्रूफ जॅकेट, वॉकी टॉकीसह इतर साहित्य जप्त केले आहे. ही शस्त्रास्त्रे जप्त केल्यानंतरही सुरक्षा दलांचं अभियान सुरूच राहणार आहे.

****

आईपीएल क्रिकेट स्पर्धेत आज दोन सामने होणार आहेत. पहिला सामना मुंबईच्या वानखेडे मैदानावर मुंबई इंडीयन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात दुपारी साडेतीन वाजता होईल. तर अन्य दुसरा सामना लखनऊच्या एकाना स्पोर्ट सिटी मैदानावार लखनऊ सुपर जायंटस आणि गुजरात टायटन्स यांच्यात संध्याकाळी साडेसात खेळला जाईल.

स्पर्धेची सध्याची गुणतालिका बघता, खेळलेले चारही  सामने जिंकून राजस्थान रॉयल्स संघ आठ गुणांसह अव्वल स्थानी आहे. तर,खेळलेले तीनही सामने गमावल्यानं मुंबई इंडीयन्स संघ सर्वात खालच्या स्थानावर आहे. ३१६ धावा फटकावणारा रॉयल चॅलेन्जर्स बेंगरुळूचा फलंदाज विराट कोहली ऑरेंज कॅपसाठी अग्रेसर आहे. तर,आठ बळी टीपणारा राजस्थान रॉयल्सचा फिरकीपटू युजवेंद्र चहल पर्पल कॅपसाठी अग्रेसर आहे. नेट रनरेटचा विचार करता कोलकाता नाईट रायडर्स प्रभावी असल्याचं दिसत असून पंजाब किंग्ज यात सर्वात पिछाडीवर आहेत.

****

कझाकस्तानच्या अस्ताना इथं आयोजित आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत  भारताच्या अनुपमा उपाध्याय आणि एम. तरुण यांनी महिला आणि पुरुष एकेरीचं अजिंक्यपद पटकावलं आहे.

****